**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २५ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर-भंडारा, गोंदिया, गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघाच्या पहिल्या टप्प्यामध्ये होणाऱ्या निवडणुकीच्या प्रमुख उमेदवारांच्या नावांची घोषणा.**
2. **देशासह राज्यात सर्वत्र होळी आणि धूलिवंदनाचा उत्साह.**
3. **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्यांमध्ये यावर्षी १६ लाख दोन हजार नवीन सभासदांची भर.**

**आणि**

4. **विदर्भासह राज्यात सर्वत्र कमाल तापमानात वाढ; काल नागपुरात मार्चमधील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद.**

*****

भाजपा/काँग्रेस उमेदवार

पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर-भंडारा, गोंदिया, गडचिरोली- चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघाच्या पहिल्या टप्प्यामध्ये होणाऱ्या निवडणुकीच्या प्रमुख उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे. भाजपनं काल देशभरातल्या १११ जागांवर उमेदवारांच्या नावाची घोषणा केली असून यात महाराष्ट्रातल्या तीन उमेदवारांचा समावेश आहे. यात भंडारा-गोंदिया मतदार संघातून सुनिल मेंढे, गडचिरोली-चिमूर मतदारसंघातून अशोक नेते आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघातून राम सातपुते यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. काँग्रेसनंही काल तीन उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. यामध्ये चंद्रपूर - वणी - आर्णी लोकसभा मतदारसंघातून प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. आमदार प्रतिभा धानोरकर या चंद्रपूरचे खासदार दिवंगत बाळू धानोरकर यांच्या पत्नी आहेत. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत बाळू धानोरकर लोकसभा निवडणुकीत उतरल्यानं त्यांनी वरोरा - भद्रावती विधानसभा क्षेत्रात पत्नी प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी मिळवून देत विजय मिळवून दिला

होता. आपण ही निवडणूक पूर्ण क्षमतेनं लढू, असा संकल्प प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केला आहे. या लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीत भाजपचे नेते आणि वनमंत्री सुधीर मुनगंटीवार प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणून निवडणुकीच्या मैदानात असणार आहेत. भंडारा- गोंदिया लोकसभा मतदार संघातून भाजपची उमेदवारी खासदार सुनील मेंढे यांना मिळाली आहे. भाजपाच्या नेत्यांनी पुन्हा आपल्यावर विश्वास दाखविला, याबद्दल मेंढे यांनी भाजपाच्या नेत्यांचे आभार मानले आहेत. या मतदारसंघात काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांचं आव्हान मेंढे यांच्यापुढं असणार आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघातून भाजपचे विद्यमान खासदार अशोक नेते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नेते यांची लढत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्याशी होणार आहे. अशोक नेते हे १९९९ ते २००९ अशी दहा वर्षं गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे आमदार होते. त्यानंतर २०१४ पासून ते आजतागायत खासदार आहेत. आता पक्षानं त्यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. दरम्यान, नागपूरच्या लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार असलेले पश्चिम नागपूरचे विद्यमान आमदार विकास ठाकरे हे आपला नामांकन अर्ज उद्या जिल्हाधिकारी कार्यालयात भरणार असून भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री तसेच भाजपचे उमेदवार नितीन गडकरी हे आपलं नामांकन येत्या २७ तारखेला भरणार आहेत. नागपूर ग्रामीणचा भाग असलेल्या रामटेक मतदार संघामध्ये काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील उमरेडचे काँग्रेस पक्षाचे आमदार राजू पारवे यांनी आपल्या पक्ष सदस्यत्वाचा तसंच आमदारकीचा राजीनामा दिला. काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला आहे.

होळी /धूळवड

विविध रंग आणि गुलाल यांची उधळण करत, वसंत ऋतूचं उत्साहात स्वागत करणारा धुलिवंदनाचा उत्सव आज देशभरात साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासियांना या उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नागरिकांना शुभेच्छा देत हा रंगांचा सण प्रत्येकाच्या जीवनात नवी ऊर्जा आणि उत्साह आणणारा असल्याचं म्हटलं आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी होळी तसंच धुलिवंदनानिमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही धुलिवंदनानिमित्त राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. हुताशनी फाल्गुनी पौर्णिमा अर्थात होळीचा सण काल सर्वत्र पारंपरिक पद्धतीनं

उत्साहात साजरा झाला. काल सायंकाळी घरोघरी तसंच सार्वजनिक ठिकाणी होलिका दहन करण्यात आलं. बुलडाणा जिल्ह्यातल्या सैलानी बाबा यात्रा महोत्सवाला कालपासून सुरुवात झाली. भाविकांच्या उपस्थितीत हजारो नारळांसह विविध वस्तू होळीत टाकण्याची परंपरा कालही पाळण्यात आली. दरम्यान चिखलीच्या आमदार श्वेता महाल्ले यांनी हरणी आणि करवंड या गावात जाऊन बंजारा समाजातर्फे महिलांसोबत होळी साजरी केली. गोंदिया जिल्ह्यात आमगाव इथं गांधी चौकात ५ हजार १०० शेणपोळ्यांनी होळी सजवण्यात आली आणि त्यावर शुद्ध शेणापासून बनवलेल्या आकर्षक सजावटीसह होलिकेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. लाकडाची होळी जाळून पर्यावरणाचा ऱ्हास करू नये, असं आवाहन यावेळी करण्यात आलं. यवतमाळ जिल्ह्याच्या वागद ईजरा येथे होळीनिमित्त बंजारा समाज हातात हात गुंफून गोलाकार होत गोरमाटी गाण्याच्या ठेक्यावर पारंपारिक लेंगी नृत्याद्वारे होळी साजरी करीत आहेत.  निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबांचं अंतिम श्रद्धास्थान असलेल्या श्री गाडगे महाराज संस्था, श्रीक्षेत्र नागरवाडी इथं परिसरात स्वच्छता अभियान राबवत पर्यावरणपूरक अभिनव होळी साजरी करण्यात आली. अमरावतीच्या अंबादेवी-एकवीरा देवी मंदिर प्रांगणातील मानाच्या होळीचं शेकडो महिला-पुरुष भाविकांच्या उपस्थितीत विधिवत पूजन-दहन करण्यात आलं.

निवडणूक आयोग

निवडणूक आयोग आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत निवडणुकांना प्रोत्साहन देत आहे. आयोगानं निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांना मतदार यादी आणि निवडणूक साहित्यासाठी कागदाचा कमीत कमी वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. मतदान मंडळानं ई-पुस्तकं आणि ई-दस्तऐवजांच्या वापरावर भर दिला आहे. मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीला प्रोत्साहन देण्यासाठी हे निर्देश जारी करण्यात आले. आयोगानं निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांना, एकेरी वापराचं प्लास्टिक पूर्णपणे टाळण्याचं आवाहन केलं आहे. राजकीय पक्षांना प्रचार कार्यक्रमांसाठी अक्षय ऊर्जा वापरास प्रोत्साहन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

चुनाव की पाठशाला

अमरावती जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत उद्या अमरावती जिल्ह्यातील सर्व दोन हजार सहाशे नव्याण्णव मतदान केंद्रावर ‘चुनाव की पाठशाला’ हा उपक्रम आयोजित

करण्यात येणार आहे. यात जास्तीत जास्त मतदारांमध्ये मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात येईल. या उपक्रमात सर्व शासकीय यंत्रणांनी सक्रिय सहभागी व्हावं, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहेत. हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व केंद्रावर एकाच दिवशी राबवणारा अमरावती हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा आहे.

भविष्य निर्वाह निधी

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्यांमध्ये या वर्षी १६ लाख दोन हजार नवीन सभासदांची भर पडली आहे. इ पी एफ ओ च्या काल जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, जानेवारीमध्ये सुमारे ८ लाख ८ हजार नवीन सदस्यांची नोंदणी झाली आहे. या सदस्यांमध्ये १८ ते २५ वर्षे वयोगटाच्या सदस्यांची संख्या जास्त आहे, तर नवीन सदस्यांमध्ये सुमारे २ लाख ५ हजार महिला सदस्य आहेत, असं केंद्रीय कामगार मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

गणवेश

जूनमध्ये सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रात राज्यातील ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश शिवून मिळणार आहेत. त्यासाठी राज्य स्तरावरून ठराविक मापात कापलेलं कापड पुरविण्यात येणार असून गावातील बचत गटाच्या महिला हा गणवेश शिवून शाळांपर्यंत पोहोचविणार आहेत. याबाबतचा ‘कार्यारंभ’ आदेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून देण्यात आला आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबत परिषदेमार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यातून एका कंत्राटदाराला ४ मार्च रोजी ४४ लाख ६० हजार ४ विद्यार्थ्यांसाठी कापड पुरवठ्याचा आदेश देण्यात आला आहे. हे कापड पुरविल्यानंतर गावपातळीवरील महिला बचत गटामार्फत गणवेशाची शिलाई केली जाणार आहे.

महाकाल

मध्य प्रदेशातील उज्जैनमधील महाकालेश्वर मंदिराच्या गर्भगृहात आज सकाळी आग लागली. ही घटना भस्म आरती दरम्यान घडली. या घटनेत पुजाऱ्यांसह 14 जण जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना इंदूर आणि उज्जैन येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. उज्जैनचे जिल्हाधिकारी नीरज सिंह यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. दोषींवर कारवाई करण्याच्या सूचना मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी दिल्या आहेत. या आगीच्या घटनेबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री यादव यांच्याशी चर्चा केली. उज्जैन इथल्या महाकाल

मंदिरातील आगीची घटना अत्यंत वेदनादायी असून त्यात जखमी झालेले सर्व भाविक लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

हवामान

३९ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस तापमानासह नागपूरमध्ये कालचा दिवस मार्च महिन्यातला सर्वात उष्ण दिवस ठरला. विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात कमाल तापमानात वाढ होत आहे. नागपुरात मागच्या आठवड्यात वादळी पावसानंतर उकाड्यात वाढ झाली आहे. अकोला इथं काल राज्यातील सर्वाधिक ४० पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदविण्यात आलं, तर मालेगावमध्ये ४० पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं सर्वाधिक तापमान नोंदविण्यात आलं. वर्धा आणि अमरावती इथं देखील कमाल तापमानात वाढ झाली आहे. विदर्भासह राज्यात सर्वत्र कमाल तापमानात वाढ होत असून या आठवड्यात कमाल तापमान २ ते ३ अंशानी वाढण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. आजही अकोल्यात सर्वाधिक ४० पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदविण्यात आलं. दरम्यान, आगामी काही तासात विदर्भातील वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची तसंच हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

टी ट्वेन्टी

आयपीएल टी ट्वेन्टी क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चैलेंजर्सचा सामना पंजाब किंग्ज संघाबरोबर होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

*****